प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएसआर-४३१७/(प्र.क्र.३०/१७)/प्रशिक्षण

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २१ जून, २०१७

वाचा :

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२४११/(८०/११)/अर्थसंकल्प, दिनांक २३/९/२०११
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-९८१४/प्र.क्र.४४(१)/एसडी-१ दिनांक २/६/२०१४
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शैगुवि-२०१५/(८०/१५)/एसडी-६ दिनांक २२/६/२०१५
४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखसं-२०१४/प्र.क्र.८२/भाग-|||/उद्योग-४, दिनांक १/१२/२०१६
५) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८/४/२०१७
६) संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे यांचा अहवाल क्र.विप्रा/१७६८/२०१६-१७ दि १९/५/२०१७
७) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांचे पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/नियोजन/२०१७-१८/१११५ दिनांक २३/५/२०१७

प्रस्तावना :

बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची राज्यात एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलांस गुणवत्तापुर्ण शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. विविध सर्वेक्षण अहवालात सातत्याने मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत घसरण होत असल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने राज्यात दिनांक २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयानूसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी वर्गातील शैक्षणिक वातावरण उत्साही, मुलांना सतत क्रियाशील ठेवणारे असावयास हवे. त्यांना विचार करण्यास चालना देणारे, त्यांची संशोधक वृती जोपासणारे, नाविन्याचा माहिती मिळविणे व त्याचा वापर करण्यास प्रवृत्त करणारे कृतीस वाव मिळवून देण्यासाठी विविध संसाधने वर्गात उपलब्ध असावयास हवी. वर्गात फक्त श्रवणावर भर न देता प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून उत्सुकता वाढविण्यास प्रोत्साहन देणाऱ्या आणि विचारास चालना देणाऱ्या उपक्रमाची संधी मुलांना देणे अगत्याचे आहे. जेणेकरून विज्ञान या विषयातील संकल्पनाचे दृढीकरण होण्यास मुलांना मदत होईल, त्यांना स्वनिर्मितीचा आनंद घेता येईल.

मुलांमधील चौकसपणा व सृजनशील कला गुणांना वाव मिळावा, विज्ञान व गणित विषयाची आवड निर्माण व्हावी, ज्या मुलांचा विशेष कल व प्रतिभा या विषयाकडे आहे त्यांना आणखीन प्रोत्साहन देवून

तश्या प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने भारत सरकारने ९ जुलै २०१५ रोजी भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते राष्ट्रीय अविष्कार अभियानाची देशभरात सुरुवात केली आहे.

या कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये नाविन्यपुर्ण असे विज्ञान व गणिताच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य संचासह प्रयोगशाळा, अध्ययन अध्यापन केंद्रे, शैक्षणिक सामुग्री, तंत्रज्ञानाचा वापर या सारखे उपक्रम घ्यावेत असे सूचित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राज्यात विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्र उभारण्याची शिफारस विद्या प्राधिकरण, पुणे यांनी केली आहे. यासाठी आवश्यक आर्थिक तरतूदीचा तपशिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने शासनास सादर केलेला आहे. यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय आविष्कार अभियान या कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध असल्याचे कळविले असून राज्यात सर्व तालुक्यांमध्ये असे विद्यार्थ्यांसाठी विज्ञान केंद्र उभारण्यासाठी अतिरिक्त निधी राज्य शासनाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस उपलब्ध करुन देण्यासाठी शासनास संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. यानुसार निवडक ५५१ शाळांमध्ये नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्र उभारण्यास व यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

१. राज्यातील गट/शहर साधन केंद्र अंतर्गत ५५१ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्र उभारण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक यांच्या प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपुर्ण विज्ञान केंद्र उभारण्यासाठी रुपये ९२.२० कोटी इतका निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर बाबीकरीता “मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च, (०१)(१०) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे (२२०२H६७९), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत तरतुदीमधून रु. ९२.२० कोटी इतका निधी खर्च करण्यात यावा.

४. यासाठी सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना “नियंत्रक अधिकारी” आणि अवर सचिव (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी यांनी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांना विनियोगाकरीता सदरचा निधी तातडीने उपलब्ध करुन द्यावा.

५. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे यांच्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १

डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील नमूद तरतुदींचे पालन करुन ई-निविदा प्रक्रिया राबवून विज्ञान केंद्र उभारणी करावी.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८/४/२०१७ च्या परिपत्रकाच्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. परिपत्रकाच्या परिशिष्ठातील अनु.क्र.८ मध्ये नमूद अटींची पुर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्रमांक १ ते ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. सदरचा निधी खर्च करतांना उद्योग विभागाच्या दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व सदरचा निधी चालू आर्थिक वर्षातच पुर्णपणे खर्च होईल याची आणि चालू आर्थिक वर्षात खर्च न झाल्यास शासनास निधी परत करण्याची दक्षता राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी घ्यावी.

६. तसेच सदरचा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला १४९/प.वि. उपविभाग-३, अनुक्रमांक-४ परिच्छेद क्र.२७(२)(ब) नुसार आणि वित्त विभागाच्या क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८/४/२०१७ अन्वये विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६२११४१२४२४७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.06.21 17:25:29 +05'30'

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
२. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहाय्यक
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधान सभा/विधान परिषद)यांचे स्वीय सहाय्यक
६. मा.सदस्य, महाराष्ट्र विधानसभा/विधान परिषद
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
१०. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, मुंबई
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१३. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे

१४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
१८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व
१९. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व
२०. स्थानिक निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२१. सहसचिव (प्रशासन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. उपसचिव (एसएम/अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. उपसचिव, वित्त / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. अवर सचिव (रोख शाखा/एस.डी.१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. वित्त विभाग (व्यय-५ / अर्थसंकल्प -८), मंत्रालय, मुंबई
२६. निवडनस्ती, (प्रशिक्षण/एसडी-१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई